**सं.फौ.ख.क्र.१८४/२०२१**
**सरकार वि. लोकेश**
**नि.क्र.०९ च्या खाली**

साक्षीदार क्र **०६** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–खुशाल चिंतामणजी कळसकर,
वय ३३ वर्ष, व्यवसाय–शेती,
राह.चनोडा, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू.</u>**

१. घटना दि.१८/१२/२०२० रोजीची आहे. सदर दिवशी माझी पत्नी प्रभावती हीचा अपघात आरोपी लोकेश मुळे याच्या रिक्शाने झाला होता. त्यानंतर माझ्या गावातील दहाघाणी या इसमाने मला फोन केला व सांगितले की, तुझ्या पत्नीचा अपघात झाला आहे. त्यानंतर मी व माझे वडील अपघातस्थळावर गेलो. त्यावेळी तेथे पाहिले असता त्या ठिकाणी माझ्या पत्नीच्या अंगावर ॲटो पडून होता. त्यानंतर पोलिस आले व तिला शवविच्छेदनासाठी नेले. मला माहिती झाले की, सदरचा ॲटो हा भरधाव वेगाने आरोपी चालवित होता. सदरचा अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे झाला होता. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखतो. आरोपी न्यायालयात हजर आहे तो तोच आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**
**<u>मध्यान्हामुळे उलटतपास तहकूब.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१६.०१.२०२६

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड

<u>मध्यान्हानंतर आरोपीतर्फे ॲड.कु.एस.एस.धोटे यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरू.</u>

२. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनेच्या वेळी माझ्या घरी हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळावर गेलो त्यापुर्वीच अपघात झालेला होता. हे म्हणणे खरे आहे की, अपघात मी प्रत्यक्ष पाहिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अपघात कसा झाला हे मी सांगु शकत नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, अपघाताबाबत मला माझ्या ताईने सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास पूर्ण.</u>

<u>फेरतपास काही नाही.</u>

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१६.०१.२०२६

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड